Special Ph.D. Commerce.

22 : 1st half-12-(i)JP

Business Economics.

**Con. 4949–12.**

**KK–1267**

14/7/12

**(मराठी रूपांतर)**

(३ तास)

[एकूण गुण : १००

**सूचना** : (१) प्रश्नपत्रिकेत एकूण **तीन** विभाग आहेत.
(२) विभाग **१** मध्ये **४०** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असून ते सर्व **अनिवार्य** आहेत.
(३) विभाग **२** मधील **पाच (५)** प्रश्नांपैकी कोणतेही **तीन (३)** प्रश्न सोडवा.
(४) विभाग **३** मधील **चारांपैकी (४)** कोणतेही **दोन (२)** प्रश्न सोडवा.
(५) **उजवी**कडील अंक प्रश्नांचे गुण **दर्शवितात**.

**विभाग एक - (गुण : ४०)**

खालील प्रत्येक विधानासाठी **'अ'** ते **'ड'** मधील सर्वात चांगला पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा :-

१. श्रमाच्या विरोधीकरणाचे तत्व ——— ने मांडले.
(अ) ॲडम स्मिथ (क) पॉल सॅम्युअलसन
(ब) मनमोहन सिंग (ड) डेव्हिड रिकार्डो

२. भारतातील ——— ह्या राज्याचा मानव विकास निर्देशांक सर्वात जास्त आहे.
(अ) केरळ (क) मणिपूर
(ब) मध्य प्रदेश (ड) महाराष्ट्र

३. ——— ही भारतातील सर्वात जुनी बँक आहे.
(अ) बँक ऑफ बिकानेर (क) आर. बी. आय
(ब) स्टेट बँक ऑफ इंडिया (ड) एच.डी.एफ.सी.

४. फिलिप्सचा वक्र ——— मधील व्यस्त प्रमाण दर्शवितो.
(अ) बेरोजगारी व अंदाजपत्रकीय तूट
(ब) सोन्यातील ठेवी व भाववाढ
(क) बेरोजगारी व भाववाढ
(ड) पैशाची मागणी व व्याजदर

५. ——— हे आंतरराष्ट्रीय साठ्याचे चलन आहे.
(अ) रूपया (क) अमेरिकी डॉलर
(ब) युरो (ड) वरीलपैकी कोणतेही नाही

६. अलीकडील काळात आधारभूत संरचनेवरील (Infrastructure) भारत सरकारचा खर्च ———
(अ) वाढत आहे
(ब) स्थिर आहे
(क) घटत आहे
(ड) 'अ' व 'ब' दोन्हीही

७. 'हिरे-पाणी विरोधाभास' म्हणजे ———
(अ) हिरे मुक्त आहेत
(ब) हिरे महाग आहेत
(क) पाणी मुक्त आहे
(ड) हिऱ्याचे उपयोगिता मूल्य कमी असले तरी त्याची किंमत जास्त आहे.

८. माल्थसच्या म्हणण्यानुसार लोकसंख्या ——— प्रमाणात वाढते.
(अ) गणिती
(ब) भूमितीय
(क) रेषीय
(ड) वरीलपैकी सर्व

९. कनिष्ठ वस्तूंना ——— विरोधाभास लागू होतो.
(अ) गिफेनचा
(ब) आयर्विनचा
(क) सेनचा
(ड) वरीलपैकी कोणताही नाही

१०. आर्थिक वृध्दीमध्ये बचत व गुंतवणूकीचे सर्वात जास्त योगदान ——— त आहे.
(अ) हॅरोड डोमर प्रतिमान
(ब) माल्थसचे प्रतिमान
(क) हेक्सचर ओहलिन प्रतिमान
(ड) लेविसचे प्रतिमान

११. ——— ना शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला.
(अ) बिल क्लिंटन
(ब) बिल गेट्स
(क) बराक ओबामा
(ड) एलिनर ओस्ट्रोम

१२. वेतन वस्तू प्रतिमान ——— नी मांडले.
(अ) वकिल व ब्रह्मानंद
(ब) केन्स
(क) ओबामा
(ड) मार्क्स

१३. ——— हे अमेरिकन नोबेल पुरस्कार विजेते फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांना सल्ला देतात.
(अ) सेन
(ब) बसू
(क) बागची
(ड) स्टिगलिस्

१४. ———— ही 'BOP' च्या असंतुलनाशी निगडीत काम करते.

(अ) गॅट (क) गॅट्स

(ब) आय. एम्. एफ (ड) डब्ल्यू.टी. ओ.

१५. एखाद्या देशाचे ———— म्हणजे अस्तित्वात असलेल्या उत्पादन तंत्राच्या सहाय्याने उपलब्ध साधनसामुग्रीच्या वापराने दोन वस्तुंचे (क्ष व य) किती उत्पादन करणे शक्य आहे अशा पर्यायी गट दर्शविणारे आलेखीय वर्णन होय.

(अ) PPC(उ. शा. व.) (क) N.I.(रा. उ.)

(ब) PCI(द. डो.उ.) (ड) N.D.P.(रा. घ. उ.)

१६. केन्सच्या सिध्दान्तातील, C= a+bY हे ———— चे वर्णन करते.

(अ) उपभोग फलन (क) गुंतवणूक फलन

(ब) बचत फलन (ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

१७. उपयोगितेचा संख्यात्मक (Cardinal) दृष्टीकोन ———— ने मांडला.

(अ) हिक्स ॲलन (क) मिल

(ब) मार्शल (ड) रॉबिनसन्

१८. महामंदीवर मात करण्यासाठी 'C+I+G'; यातील 'G' वर ———— ने भर दिला.

(अ) रिकार्डो (क) केन्स

(ब) से (ड) सॅम्युअलसन

१९. भांडवल सखोल (Capital Intensive) उत्पादन म्हणजे ————

(अ) भांडवलची मुबलकता (क) श्रमाची मुबलकता

(ब) कर्जाची मुबलकता (ड) वरीलपैकी कोणतेही नाही

२०. जागतिक बँक (World Bank) ही ———— म्हणूनही ओळखली जाते.

(अ) IBRD (क) IDA

(ब) IMF (ड) IGIDR

२१. सन १९९१ पासून भारतीय रिझर्व बँकेने स्वीकारलेली विनिमय दर व्यवस्थापन पध्दती ———— म्हणून संबोधिली जाते.

(अ) स्थिर विनिमय दर (Fixed)

(ब) लवचिक विनिमय दर (Flexible)

(क) बाजारभिमुख विनिमय दर (Market determined)

(ड) व्यवस्थापित विनिमय दर (Managed)

२२. 'संयोजक हा आर्थिक विकासाचा कारण व परिणाम आहे' असे ——— म्हणतात.

(अ) कार्ल मार्क्स (क) जोसेफ शुंपीटर

(ब) रिकार्डो (ड) आल्फ्रेड मार्शल.

२३. बाराव्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड ——— आहे.

(अ) २०१२-२०१७ (क) २०००-२००५

(ब) २०१७-२०२२ (ड) २००६-२०११

२४. भारतीय संसदेने घटनेतील ८० व्या दुरुस्तीने प्राथमिक शिक्षणाचा हक्क हा ——— हक्कआहे असे मंजूर केले.

(अ) मूलभूत (क) अनावश्यक

(ब) मानव (ड) वरीलपैकी कोणताही नाही

२५. संशोधकाने वापरलेले स्तरीत नमुना तंत्र हे ——— असते.

(अ) औपचारिक व अतिशय परिणामकारक (क) सर्वसाधारण चित्राचे निदर्शक

(ब) अपरिणामकारक (ड) वरील सर्व

२६. 'आंतरराष्ट्रीय व्यापार ही प्रादेशिक व्यापाराची विशेष बाब आहे' असे ——— सिध्दांत मांडतो.

(अ) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सनातन पंथीय सिध्दांत

(ब) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आधुनिक सिध्दांत

(क) सोलोचा सिध्दांत

(ड) कोल हुअर सिध्दांत

२७. इतरांनी मांडलेल्या अभ्यासाचा आढावा घेताना ——— चा वापर होतो.

(अ) अस्तित्वात असलेले ज्ञान, अनुभव आणि आधीच्या संशोधकांनी केलेला अभ्यास

(ब) नवीन ज्ञानाचे स्रोत

(क) राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण

(ड) वरील सर्व

२८. ——— चा सांख्यिकीय विश्लेषणासाठी उपयोग होतो

(अ) गुणात्मक संशोधन (क) अ व ब दोन्ही

(ब) संख्यात्मक संशोधन (ड) वरीलपैकी कोणताही नाही

२९. भारतात ——— तंत्रज्ञान वापरले जाते

(अ) भांडवलप्रधान (क) मध्यममार्गी (Intermediate)

(ब) श्रमप्रधान (ड) वरील सर्व

३०. ग्राहकासाठी वस्तूच्या मागणीच्या संदर्भात ——— हे महत्त्वाचे चल आहे.
(अ) चुकवलेला कर (क) निवृत्ती वेतन
(ब) किंमत (ड) परदेश सहली

३१. 'औद्योगिक राखीव सैन्य' ही संकल्पना ——— ने मांडली.
(अ) जॉन मनिआर्ड केन्स (क) डल्यू. डल्यू. रोस्टो
(ब) कार्ल मार्क्स (ड) ऑर्थर लेविस

३२. व्यक्तिगत संशोधकाची प्राथमिक माहिती संकलनाची ——— ही पध्दत आहे.
(अ) लोकसंख्या सर्वेक्षण (क) जनगणना
(ब) प्रश्नावली (ड) वरीलपैकी नाही

३३. ——— हे अभ्यासपूर्ण विश्लेषण करुन सरकारला आर्थिक धोरण ठरविण्यासाठी शिफारसी करतात.
(अ) सामाजिक कार्यकर्ते (क) अर्थशास्त्रज्ञ
(ब) इतिहासकार (ड) धर्मगुरु

३४. बहुलक/भुयिष्टक (Mode) हे ——— चे सर्वसाधारण परिमाण आहे.
(अ) केंद्रीय प्रवृत्ती (क) सहसंबंध
(ब) विचलन (ड) चतुर्थक विचलन

३५. ——— हे खाजगी वस्तूचे उदाहरण आहे
(अ) शिक्षण (क) लॅपटॉप्स
(ब) सार्वजनिक इस्पितळे (ड) सार्वजनिक रस्ते

३६. ——— एखाद्या पेढीच्या (Firm) निर्णय प्रक्रियेशी निगडीत असते.
(अ) समष्टी अर्थशास्त्र (क) सूक्ष्म अर्थशास्त्र
(ब) सार्वजनिक वित्त (ड) वरील सर्व

३७. एखाद्या वस्तूवर अप्रत्यक्ष कर लादला असता ———
(अ) उपभोग वाढतो (क) उत्पादन वाढते
(ब) उपभोग कमी होतो (ड) वरील सर्व

३८. भारतातील एकूण रोजगारातील सार्वजनिक क्षेत्राच्या रोजगाराचा हिस्सा अलिकडच्या काळात ——— आहे.
(अ) स्थिर (क) वाढत
(ब) घटत (ड) वरीलपैकी कोणतेही नाही

[ TURN OVER

३९. भारताची दुसरी पंचवार्षिक योजना ——— वर आधारित होती.

(अ) हॅरोड-डोमरचे उत्पादन फलन (क) महालनोबिस प्रतिमान

(ब) वॉलरसचे उत्पादन फलन (ड) वकिल ब्रम्हानंद प्रतिमान

४०. रोखतेचा सापळा ——— मधील संबंध स्पष्ट करतो.

(अ) उत्पन्न व उपभोगिलेली रक्कम (क) व्याजदर व पैशाची मागणी

(ब) खर्च व बचत कलेले उत्पन्न (ड) वरीलपैकी कोणतेही नाही

## विभाग दोन - (गुण : ३०)

खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अ) मक्तेदाराचा अल्पकालीन समतोल स्पष्ट करा. १०

(ब) केन्सची 'परिणामकारक मागणी' ही संकल्पना मांडा. १०

(क) अलिकडच्या काळात भारतात करमहसूलाची प्रवृत्ती स्पष्ट करा. १०

(ड) जागतिक व्यापार संघटनेच्या कृषी कराराचे भारतीय कृषीक्षेत्रावरील परिणाम तपासा. १०

(इ) भारतातील गेल्या दशकातील लोकसंख्या धोरणाचा आढावा घ्या. १०

## विभाग तीन - (गुण : ३०)

कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अ) १९९७-९८ नंतर भारतात बँकिंग क्षेत्रात झालेल्या बदलांचा आढावा घ्या १५

(ब) आंतरराष्ट्रीय व्यापारातील 'घटक किंमती समानीकरण' (factor price equalisation) स्पष्ट करा. १५

(क) 'युरो झोन' चे संकट नेमके काय ते सांगून त्यावर उपाय सुचवा १५

(ड) परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक व परकीय संस्थात्मक गुंतवणूक (FDI & FII) यातील फरक सांगून अलिकडच्या काळातील भारतातील त्यांच्या प्रवाहाची प्रवृत्ती स्पष्ट करा. १५